sap.rgsy2010@gmail.com

एसआयआरडी-११/२०१०-११/आरडीडी/०३
दि. १७/०२/२०११

प्रति,
**मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,**
जिल्हा परिषद ( सर्व आर जी एस वाय जिल्हे : *सांगली, रत्नागिरी व ठाणे वगळून* )
जिल्हा

**विषय : राष्ट्रीय ग्राम स्वराज योजनेअंतर्गत नवीन निवडून आलेल्या ग्रामपंचायत सदस्यांचे प्रशिक्षण**

संदर्भ : १. पंचायती राज मंत्रालय, केंद्र शासन, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. एन-११०१९/३३/२०१०-आरजीएसवाय, दिनांक. २ नोव्हेंबर २०१०
२. ग्राम विकास व जलसंधारण विभागाचे पत्र क्र. टीआरजी-२०१०/सीआर-१५५/योजना-४, दिनांक ८ नोव्हेंबर २०१०
३. ग्राम विकास विभागाचे पत्र क्र. टीं आरजी-२०१०/सीआर-१५५/योजना-४, दि. २९ नोव्हेंबर २०१०
४. एसआयआरडी-११/२०११-११/०३, दि. ३ डिसेंबर २०१० व दि.२१ जानेवारी २०११
५. राग्राविसं/माक्षेअनि/१०-११/ईओआय, दि ०४/०२/२०११

राष्ट्रीय ग्राम स्वराज योजने अंतर्गत राज्यातील ( **दि. १/१/२०१० नंतर निवडून आलेले** ) नवनिर्वाचित ग्रामपंचायत सदस्याच्या क्षमतावृध्दीसाठी प्रशिक्षण कार्यक्रम ग्राम विकास विभाग व यशदामार्फत सुरु करण्यात आलेला आहे. हा कार्यक्रम **मोहीम स्वरूपात** राज्यातील २१ जिल्हयांमध्ये सुरुवातीस ग्रामसेवक / पंचायत राज व संयुक्त प्रशिक्षण केंद्रांमार्फत दि. ६ डिसेंबर २०१० पासून राबविण्यात येत असल्याचे आपणास माहिती आहेच. राज्यातील ग्रामपंचायत सदस्यांचे प्रशिक्षण स्वयंसेवी संस्थांमार्फतही सुरु करावयाचे असल्याने राज्य शासन व यशदाने निवड केलेल्या स्वयंसेवी संस्थांची यादी संदर्भ क्र ५ अन्वये आपणाकडे फॅक्सने पाठविण्यात आलेली आहे. त्यानुसार आपल्या जिल्हयातील संबंधित स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींना बोलावून आपण पुढील कार्यवाही सुरु केली असेलच.

मार्च २०११ पावेतो राष्ट्रीय ग्राम स्वराज योजने अंतर्गत **ग्रामसेवक / पंचायत राज व संयुक्त प्रशिक्षण केंद्रांमार्फत घेण्यात येत असलेल्या ग्रामपंचायत सदस्यांचे उद्दिष्ट** वगळून स्वयंसेवी संस्थांमार्फत जिल्हयातील किती ग्रामपंचायत सदस्यांचे प्रशिक्षण पूर्ण करणे अपेक्षित आहे हे सोबतच्या

प्रपत्रात नमुद करण्यात आले आहे. <u>**यशदा स्तरावरील निधीची उपलब्धता लक्षात घेता साधारणत: तेवढेच काम मार्च २०११ अखेर अपेक्षित आहे**</u> उर्वरित ग्रामपंचायत सदस्यांचे प्रशिक्षण हे मार्च २०११ नंतर करता येवू शकेल. <u>**सदरहू उद्दिष्ट व संबंधित स्वयंसेवी संस्थांकडील मनुष्यबळ, सुविधा इ बाबी विचारात घेवून आपल्या जिल्हयासाठी निवडलेल्या संस्थांचे माहे मार्च २०११ पर्यंतचे उद्दिष्ट निश्चित करण्यात यावे व त्याबाबत यशदास अवगत करण्यात यावे.**</u>.. एखादया जिल्हयात सदरहू उद्दिष्ट साध्य करणे शक्यच नाही / जास्तीचे उद्दिष्ट साध्य करणे निश्चित शक्य आहे असे आपले मत असल्यास त्वरीत मेलव्दारे कळवावे व सहयोगी प्राध्यापक श्री. एन पी मित्रगोत्री यांचेशी जास्तीत जास्त दोन दिवसात कृपया संपर्क साधावा.

वरीलप्रमाणे आपल्या जिल्हयात मार्च २०११ पर्यंतचे देण्यात आलेले उद्दिष्ट विचारात घेवून त्याप्रमाणे मुद्रित वाचन साहित्याच्या प्रती एस टी च्या पार्सल यंत्रणेमार्फत अलाहिदा आपणाकडे पाठविण्यात येत आहेत. त्यासाठी आपण आपल्या जिल्हयातील एस टी डेपोशी संपर्क साधुन साहित्य प्राप्त करुन घेवून संबंधित संस्थांनां त्यांचे मार्चपर्यंतचे उद्दिष्ट विचारात घेऊन वितरीत करुन त्याबाबतचा अहवाल यशदास व राज्य शासनास पाठवावा.

आपल्या जिल्हयाचे उद्दिष्ट व उपलब्ध निधी विचारात घेवून यशदामार्फत आपणास लवकरच निधी पाठविण्यात येत आहे. ग्रामपंचायत सदस्यांच्या प्रशिक्षणासाठी प्रती प्रशिक्षणार्थी प्रती दिन रुपये ३००/- या प्रमाणे निधी यशदा स्तरावरुन उपलब्ध करून देण्याबाबत राज्य शासनाने सुचित केले आहे. सदर निधीतून प्रशिक्षणांर्थीसाठी निवास, भोजन, प्रशिक्षण साहित्य त्याचप्रमाणे प्रशिक्षक मानधन, क्षेत्र भेटीवरील खर्च, प्रशिक्षणार्थींचे जाण्या-येण्याचे एकवेळचे प्रवास भाडयाची रक्कम व प्रशिक्षण अनुषंगिक अन्य सर्व बाबींवर खर्च करावयाचा आहे. याबाबत संबंधित संस्थांनां अलाहिदा कळविणेत आले आहे. <u>**संस्थेला आपणाकडून देण्यात येणारे उद्दिष्ट व आपणास देण्यात येणारा निधी या बाबी विचारात घेवून संस्थांनां निधी वितरीत करण्यात यावा**</u>. स्वयंसेवी संस्था व यशदाच्या दरम्यान झालेल्या करारानुसार संबंधित संस्थांना पुढीलप्रमाणे निधी देय आहे. अग्रीम १० टक्के, महिन्याचे/ तीन महिन्याचे प्रशिक्षणाचे काम झाल्यावर ७० टक्के व २० टक्के सर्वात शेवटी ( करारनाम्यातील याबाबतच्या करारातील लागु पुरत्या भागाची प्रत सोबत माहितीसाठी जोडली आहे).

संपूर्ण करारनाम्याची प्रत आपणाकडे स्वतंत्ररित्या पाठविणेत येईल. तसेच करारनाम्यातील अटीनुसार संस्थेने अग्रीमा इतक्या रक्कमेची **<u>मा. महासंचालक, यशदा</u>** यांचे नावे राष्ट्रीयीकृत बँकेची गॅरंटी देणेही गरजेचे आहे. त्यानुसार आवश्यक कार्यवाही करावी व यशदाकडे पाठवावी. मात्र एखादया संस्थेस बँक गॅरंटी देणे शक्य नसल्यास त्यांना अग्रिम रक्कम देवू नये. जसजसे प्रशिक्षण कार्यक्रम होतील त्याप्रमाणे प्राप्त अहवाल, करारनाम्यातील तरतुदी व अनुषंगिक बाबी विचारात घेवून निधी वितरीत करण्यात यावा. तथापि संबंधित सर्व संस्थांनां निधी **<u>वेळच्यावेळी व अडचणी न येता प्राप्त होईल याची कृपया विशेषत्वाने दक्षता घ्यावी.</u>**

ग्रामपंचायत सदस्यांचे **सर्व प्रशिक्षण कार्यक्रम हे निवासी तसेच गुणवत्तापूर्वकच होतील या दृष्टिने विशेषत्वाने काळजी घेण्यात घ्यावी.** या संदर्भात आवश्यक त्या सुचना या कार्यालयाचे पत्र क्र एसआयआरडी-११/२०११-११/०३, दि. ३ डिसेंबर २०१० व दि.२१ जानेवारी २०११ व्दारे अलाहिदा दिलेल्या आहेत.

दि. ३ डिसेंबर २०१० व दि.२१ जानेवारी २०११ च्या पत्रासोबत दिलेल्या **प्रपत्र- अ** व **प्रपत्र-ब** तसेच नमुन्यात अहवाल/माहिती यशदाकडे व राज्य शासनाकडे विहीत मुदतीत सादर होईल असे पहावे. दि. ३ डिसेंबर २०१० च्या पत्रासोबत प्रशिक्षण कार्यक्रमाबाबतचा मूल्यामापन अहवालाचा नमुना दिला आहे, त्या नमुन्यात अहवाल भरुन घेतले जातील व त्यातील सुचनांचा योग्य तो विचार होईल असे पहावे.

यशदाशी पत्रव्यवहार करताना अहवाल पाठविताना प्रथमतः **sap.rgsy2010@gmail.com** व **npmitra@gmail.com** या मेलवर पाठविण्यात यावा. तसेच ई-मेलव्दारे मराठीत पत्रव्यवहार करताना **ISM** च्या **DV-TTDhruv** या **Font** वापरावा. मात्र अहवाल प्रथम मेलने पाठवून नंतर टपालानेही पाठविणे गरजेचे आहे.

या व यापूर्वी दिलेल्या व भविष्यात देण्यात येणाऱ्या सर्व सुचना संबंधित संस्था, सर्व गट विकास अधिकारी तसेच अन्य सर्व संबंधितांच्या निदेर्शनास वेळावेळी आणाव्यात. या कामासाठी शासनाने घोषित केल्यानुसार उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) हे नोडल अधिकारी असतील. तथापि पंचायत विभागातील एका जबाबदार व माहितगार कर्मचाऱ्याकडे हे काम सोपवावे. उपमुख्य

कार्यकारी अधिकारी (पंचायत) व त्या व्यक्तिचे नाव, हुद्दा, कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक व भ्रमणध्वनी क्रमांक हा तपशील यशदास व शासनास पाठवावा.

यापूर्वीची या संदर्भातील पत्रे, अहवालाचे नमुने, वाचन साहित्य, वेळापत्रक, मोडयुल इ. सर्व बाबी यशदाच्या वेबसाईट वर उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. हे पत्र तसेच वेबसाईट वर यापुढील महत्वाची पत्रेही वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात येत आहेत. तरी वेळावेळी यशदाच्या वेबसाईटचे अवलोकन होऊन आवश्यक कार्यवाही व्हावी. वेबसाईटसाठी लिंक पुढीलप्रमाणे आहे.

( www.yashada.org → **Organization** → **Rural Development** → **R.G.S.Y** )

वरीलप्रमाणे आवश्यक कार्यवाही होईल असे पहावे व **प्रशिक्षणातून विकास अभियान** यशस्वी होण्यासाठी सहकार्य करावे, ही विंनती

**सोबत:** १. मार्च पर्यंत साध्य करावयाचे उद्दिष्ट व पाठविण्यात येणा-या वाचन साहित्याच्या प्रतींची संख्या दर्शविणारे प्रपत्र

२. करारनाम्यातील लागुपुरता पेमेंट संदर्भातील भाग

**( डॉ. कृष्णा लव्हेकर )**
उपमहासंचालक तथा संचालक,
राज्य ग्रामीण विकास संस्था

**प्रत माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी :**

१. **उपायुक्त** ( आस्थापना ), विकास शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व)
२. **उपमुख्य कार्यकारी अधिकारी** ( **ग्रां.पं.**), जिल्हा परिषद ----------------

**प्रत माहितीसाठी सस्नेह :**

- मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद **सांगली, रत्नागिरी व ठाणे**

**प्रत माहितीसाठी सादर;**

१. **मा. सचिव**, ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
२. **डॉ. मल्लिनाथ कलशेटटी**, उपसचिव, ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

# 3. PAYMENT SCHEDULE

3.1 This Agreement would follow the cost norms as set out in annexure-01[1] to this agreement for providing training to Panchayat Elected Representatives (ERs) and support functionaries. Any amendment in the cost norms will be informed to the SPA by YASHADA / GoM.

3.2 Basis of payment: The payment basis will be the end of training reports for trainings and exposure visits completed and comprising training process documentation report, training evaluation report and the end of training report, exposure visit plan and end of exposure visit report for all visits completed. The reports will need certification by CEO of the Z.P. or the officer to whom the CEO will delegate his power to certify. And uploading the PIP's of YASHADA.

3.3 Method of payment: 10% of the total approximated cost of the project will be paid as advance based on the submission of appropriate Bank Guarantee of amount equal to the advance amount. 70% of the funds will be paid in monthly/quarterly installments on prorate basis based on the numbers of trainings completed reported by monthly report of the SPA. Final 20% of the funds will be released on the

- Submission of year end training report based on final adjustments of planned and actual training programmes completed; and PIP uploaded.
- Receipt of verification letters of Chief Executive Officer, Zilla Parishad of concerned district's about training completed in the year from relevant districts officials
- Satisfactory performance reported by the Monitoring & Evaluation agency.
- Audited financial statements of the project along with utilization certificate by a certified and registered Chartered Accountant

3.4 PROCESS OF PAYMENT-

SPA will open a dedicated bank account for this project. SPA will be paid in to this designated account, based on receipt of valid invoice from the SPA for all payments. The invoice should list out all relevant details (numbers of trainings/exposure visits completed evidenced by all the specified reports as earlier) and accompanied by all reports as specified.

3.5 DEDUCTIONS- The payments will be made by cheque or RTGS and subject to all statutory deductions as per the prevailing laws. For TDS deductions if any YASHADA / GoM will provide TDS certificates as needed.

---

| **Capacity Building of V.P.Members Elected after 01/01/2010Training Programme under RGSY through NGOs**<br>( Excluding the Target given to GTCs/PRTCs/CTC ) | | | | |
|---|---|---|---|---|
| **Sr No** | **Name of Dist** | **Approximate No. of V.P. Members to be Trained ( Exculding the target given to GTC/PRTC )** | **Target to be acheived through NGOs by March 2011** | **Copies of Reading Material being sent** |
| **1** | **2** | **3** | **4** | **5** |
| 1 | Thane | All Target upto MARCH 2011 to be covered by **PRTC** | | |
| 2 | Raigad | 584 | 400 | 450 |
| 3 | Ratnagiri | All Target upto MARCH 2011to be covered by **PRTC** | | |
| 4 | Sindhudurg | 259 | 259 | 300 |
| 5 | Nashik | 4693 | 3250 | 3300 |
| 6 | Jalgaon | 4792 | 3350 | 3450 |
| 7 | Pune | 3152 | 2050 | 2100 |
| 8 | Satara | 5068 | 2500 | 2550 |
| 9 | Sangli | All Target upto MARCH 2011 to be covered by **CTC** | | |
| 10 | Solapur | 2160 | 1600 | 1650 |
| 11 | Kolhapur | 714 | 500 | 600 |
| 12 | Jalna | 1440 | 1000 | 1050 |
| 13 | Parabhani | 2744 | 1900 | 1950 |
| 14 | Beed | 1016 | 700 | 750 |
| 15 | Osmanabad | 3440 | 2350 | 2400 |
| 16 | Latur | 1768 | 1300 | 1350 |
| 17 | Akola | 600 | 425 | 450 |
| 18 | Washim | 592 | 425 | 450 |
| 19 | Buldhana | 759 | 550 | 600 |
| 20 | Nagpur | 144 | 144 | 150 |
| 21 | Wardha | 392 | 392 | 450 |
| **TOTAL** | | **34317** | **23095** | **24000** |

१. क्र.३ मधील संख्येत तफावत असल्यास तसेच किंवा रकाना ४ मधील उद्दिष्ट साध्य होणे शक्य नसल्यास यशदास व शासनास अगदी लगेच अवगत करावे.

**टीप :** २. संस्थानिहाय उद्दिष्ट जिल्हा परिषद स्तरावर निश्चित करावे. त्याबाबत अवगत करावे.

३ पुस्तके प्राप्त होताच प्रथम मेलव्दारे अगदी लगेच कळवावे.

**उपमहासंचालक तथा संचालक,**

राज्य ग्रामीण विकास संस्था